# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २६.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २५/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३७,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**खुनाचा करणा—या विरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक २५/१२/२०२२ रोजी पोस्टे बासंबा येथे कलम ३०२,१०९,५०४,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीतांनी संगणमत करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कंपाउंडचे मागील असलेल्या सार्वजनिक ठिकाणी असलेल्या फिर्यादीचे जनावरांचे गोठया जवळ मयत हा साफसफाई करत असतांना मागील भांडणाचे कारणावरून भांडणाची कुरापत काढुन आ.क्र ०१ याने जिवे ठार मारण्याचे उदेशाने मयताचे पोटात,डावे बरगडीवर, चाकुने वार करून गंभीर जखमी करून त्यास जिवे ठार मारले व आ.क्र ०२ व ०३ यांनी आ.क्र ०१ यास मयतास मारून टाक खल्लास कर म्हणुन अपप्रेरणा दिली आहे म्हणुन गुन्हा दाखल. होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.

**कॉपी राईट ॲक्ट सदरखाली दाखल गुन्हे:—**

दिनांक २५/१२/२०२२ रोजी पोस्टे कळमनुरी येथे कलम ५१,५२,६३,६५ कॉपी राईट ॲक्ट १९५७ व कलम १०३,१०४ ट्रेडमॉर्के १९९९ अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद आरोपीने कळमनुरी येथे मुख्य बाजार पेठ मध्ये जुने पोलीस स्टेशन ते पोस्टे ऑफीस रोड येथे टिबरेवाला इलेक्ट्रीकल्स लि.कंपनीचे ब्रॅन्ड टिबकॉन कन्डेनसर एम/एस धुप चंद ॲन्ड कंपनीचे सामानाशी हुबेहुब दिसणारा बवउवितज चे रिकामे कव्हर व एम/एस आशिका इंसेंस इस कंपनीचे सामानाशी हुबेहुब दिसणारा ह्सममच ्मससे चे रिकामे कव्हर विक्री करण्याचे उदेशाने मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल. होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २५/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०१ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.